**महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित/**
**अतारांकित/अल्पसूचना प्रश्नांची उत्तरे**
**QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीव्दारे**
**ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**
**क्रमांक : १७२३५ /ई-१**
**दिनांक : २२ जून, २०१७**

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.४२६९/ई-१, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१७.**

## :: परिपत्रक ::

विधानमंडळाच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्याच्या धोरणांतर्गत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या प्रश्नांचे कामकाज संपूर्णत: कागदविरहीत करुन ऑनलाईन (online) पध्दतीने प्रश्नांचे कामकाज करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आगामी तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०१७ करिता तारांकित स्वीकृत प्रश्न ऑनलाईन पध्दतीने विभागास पाठविण्यात येणार असून, प्रश्नांची उत्तरे विहित कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार आहेत.

प्रस्तूत प्रकरणी सर्व मंत्रालयीन विभागांच्या विधीमंडळ समन्वय कक्षातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणाली हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले असून तद्नंतर सदरहू प्रणाली वापरण्याकरिता सर्व मंत्रालयीन विभागांच्या विधीमंडळ समन्वय कक्षांस त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यासनांचे **Username** व **Password** देण्यात आले आहेत. उक्त संगणकीय प्रणाली हाताळण्याबाबची **माहिती पुस्तिका** महाराष्ट्र विधानमंडळाच्या **mls.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रश्न सूचना ऑनलाईन पध्दतीने पाठविणे व त्यांची उत्तरे त्याच पध्दतीने पाठविण्याबाबत खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.

- सर्व **तारांकित/अतारांकित व अल्पसूचना प्रश्न QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे सर्व मंत्रालयीन विभागांच्या विधीमंडळ समन्वय कक्षांना पाठविण्यात येतील. तद्नंतर सर्व समन्वय कक्षांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधित कार्यासनांना सदरहू प्रश्न सूचना **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारेच पाठवाव्यात.
- मंत्रालयीन विभागांना उत्तराकरिता पाठविण्यात येणाऱ्या सर्व **तारांकित/अतारांकित/अल्पसूचना** प्रश्नांची उत्तरे **QIS** या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीनेच या सचिवालयास पाठविण्यात यावी.
- **QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीचा गत सत्रापासून अवलंब करण्यात आला असून अपवादात्मक बाब म्हणून आगामी अधिवेशनाकरीताच उत्तराच्या १० प्रतींऐवजी (Hard copies) ३ प्रतीच स्वीकारण्यात येतील.**
- तारांकित स्वीकृत प्रश्नाचे विभागाकडून उत्तर प्राप्त होण्याचा दिनांक सुनिश्चित करून विभागास कळविण्यात येत असून त्यानुसार विभागाकडून कार्यवाही होत असते. तथापी प्रश्न हस्तांतरीत करण्याची परिस्थिती उद्‌भवल्यास उक्त बाब संबंधित विभागातील कक्षाने तातडीने कार्यवाही करून ज्या विभागाशी प्रश्न संबंधित आहे त्या विभागाकडे त्वरीत पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी. अशा प्रकरणामध्ये तातडीने **विधानपरिषद** प्रश्न कक्षाच्या **e1.qust.mls@gmail.com** या ई-मेलवर तसेच **QIS** प्रणालीद्वारे ऑनलाईन हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करुन या सचिवालयास अवगत करण्यात यावे.

..२/-

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०१७ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशनातील **सोमवार, दिनांक २४ जुलै,** २०१७ ते **शुक्रवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७** या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (पुढील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

(१) मा.मंत्री यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी नेमून देण्यात आलेले दिनांक.
(२) तारांकित प्रश्नांच्या उत्तरांच्या प्रत्येकी ०३ (तीन) प्रती छापील स्वरुपात (हार्ड कॉपी) व डिजिटल स्वरुपातील (सॉफ्ट कॉपी) या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक.

आपली,

(पूनम ढगे)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

---

(१) संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
(२) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई (प्रत्येकी तीन प्रती)
(३) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(४) मा. मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (प्रत्येकी तीन प्रती) यांना
माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.